किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०/२०२२
विठठल व इतर वि गणेश व इतर
निशाणी क्र. १३ क्रमश :

अर्जदारातर्फे साक्षदार क्र. १ यांचा उलटतपास गैरअर्जदारांचे वकील श्री एन.आर.राठी यांचे मार्फत.

८. हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं. ३६/१ हे शेत अगोदर अंबादास मारोती खारोडे यांच्या मालकीचे होते. हे म्हणणे खरे आहे की ते दि. ५.३.१९५८ रोजी मरण पावले. हे म्हणणे खरे आहे की अंबादास यांच्या मृत्युनंतर सदर सर्वे नं. ३६/१ ही जमीन अंबादास यांचे वारस म्हणजेच त्यांची पत्नी विमलाबाई व मुले रमेश खारोडे व सुभाष खारोडे यांच्या नावे आली. हे म्हणणे खरे आहे की विमलबाई, रमेश व सुभाष यांचे दरम्यान सदर शेताबाबत सन १९७२ साली पंजीबध्द दस्त क्र. ११०८ या दि. ३१.५.१९७२ रोजीच्या दस्ताने वाटणी झाली. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर विमलाबाई यांच्या मृत्युपर्यंत त्यांची सेवाश्रृषुशा ही सुभाष अंबादास खारोडे व त्यांचे वारस यांनी केली. मुळ दाव्यात आम्ही पाच वादी आहोत. हे म्हणणे खरे आहे की विशेष दि.दावा क्र. १५/२०१८ हा दावा दि. ४.९.२०२० पासुन पुराव्यासाठी लागला होता. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर दि. ७.१०.२०२०, २६.११.२०२०, ११.१.२०२१, ६.२.२०२१, ५.३.२०२१, १९.३.२०२१, १६.४.२०२१, २५.६.२०२१ व ९.८.२०२१ रोजी आम्ही सतत गैरहजर असल्याने सदर दावा खारीज आदेशासाठी लावण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की आम्ही त्या दाव्यात सतत गैरहजर असल्यामुळे दि. १४.१०.२०२१ रोजी न्यायालयाने दावा खारीज करण्याचा योग्य आदेश पारीत केला होता. हे म्हणणे खरे नाही की आम्हाला सदर दावा चालवायचा नव्हता परंतु आम्हाला केवळ गैरअर्जदारांना त्रास द्यायचा होता म्हणुन आम्ही तो दाखल केला होता व त्याच कारणावरून आम्ही हा किरकोळ दिवाणी अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी दिवाणी न्यायाधीश क.स्तर तेल्हारा यांचे समक्ष आमचेविरूध्द नि.दि.दा.क्र. २५/२०१० दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की सदर दावा हा सुध्दा सर्वे क्र. ३६/१ या शेत जमीनीबाबत दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की दि. २८.३.२०२३ रोजी सदर दावा या

प्रकरणातील गैरअर्जदारांच्या बाजुने मंजुर केला आहे. आता मला सदर नि.दि.दा.क्र. २५/२०१० मधील दि. २८.३.२०२३ रोजीच्या न्यायनिर्णयाची सत्यप्रत दाखविण्यात आली. सदर न्यायनिर्णयाच्या सत्यप्रतीला निशाणी १९ देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की आम्ही या प्रकरणात दि. १४.१०.२०२१ रोजीचे आदेशाची प्रत मिळविण्यासाठी जाणुनबुजुन उशीरा अर्ज दाखल करून प्रत घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ३ व ४ मधील मजकुर खोटा लिहला आहे. हे म्हणणे खरे नाही की आम्ही हेतुपुरस्सर वेळेत अर्जाची प्रत मिळण्याकरीता न्यायालयात अर्ज केलेला नाही व वेळेत अर्जाची सत्यप्रत स्विकारलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की केवळ गैरअर्जदारांना त्रास होण्याच्या उददेशाने आम्ही हा किरकोळ दिवाणी अर्ज दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की आमचा सदर अर्ज मुदतीत नाही व आम्ही गैरअर्जदारांना त्रास देत असल्यामुळे त्यांना नुकसान भरपाई म्हणुन २५ हजार रूपये ही खर्चाची रक्कम देण्यास बाध्य आहोत. हे म्हणणे खरे नाही की या किरकोळ अर्जात दाव्यात लिहलेल्या कथनांचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

( महेश श्री. काळे )
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
अकोट.
दिनांक २४.११.२०२३

माझे समक्ष

( महेश श्री. काळे )
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
अकोट.
दिनांक २४.११.२०२३